मा.कोर्ट प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** उस्मानाबाद **P.S.(ठाणे):** कळंब
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0216 **Year (वर्ष):** 2024
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**19/05/2024 21:04
2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 14/05/2024
      **Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/05/2024
      **Time From (वेळेपासून):** 16:08 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 17:44 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
      **Date (दिनांक ):** 19/05/2024 **Time (वेळ):** 20:57 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
      **Entry No. (नोंद क्र.):** 042
      **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/05/2024 20:57 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
      दक्षिण, 0.4 किमी **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** तहसील कार्यालय कळंब चे आवारात ,कळंब

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
      **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
      **District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): राहुल भगवंत कवडे
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1999
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कन्हेरवाडी ता कळंब,कळंब ,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कन्हेरवाडी ता कळंब,कळंब ,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9960201674

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.कल्याण शामराव राठोड | | | 1. तलाठी, सज्जा अंदोरा,,मुळ रा आंधरवन पिंपरीताजिबीड , ज्ञानेश्वर नगर,बीड ताजिबीड , बीड शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
फिर्याद दिनांक 19.05.2024

मी राहुल भगवंत कवडे, वय 25 वर्ष, व्यवसाय- शेती रा.कन्हेरवाडी ता. कळंब जि.धाराशिव मोबाईल नंबर 9960201674.
दिनांक 14.05.2024 रोजी मी कळंब येथे सुरक्षीत ठिकाणी हजर राहुन तक्रार दिली होती. त्यामधील हकिगत अशी की, " मी वरील गावचा राहणारा असुन माझे इयत्ता बारावीपर्यंत शिक्षण झालेले आहे. मौजे अंदोरा शिवारात माझी वडीलोपार्जीत शेत जमीन असुन मी शेती व्यवसाय करुन माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहे. माझा मोठा भाऊ महेश कवडे याचे नावाने गेल्या पंधरा दिवसापुर्वी मौजे अंदोरा शिवारातील शेत गट नंबर 29 मधील 55 आर शेत जमीन तडवळा येथील धनंजय पाटील यांचेकडुन खरेदी करुन घेतलेली आहे. गेल्या आठ दिवसापुर्वी सदर खरेदी घेतलेल्या जमीनीचा फेरफार नोंद करण्यासाठी मी अंदोरा सज्जाचे तलाठी श्री. राठोड साहेब यांच्याकडे भाऊ महेश कवडे यांचे नावाने अर्ज देवुन त्यासोबत कागदपत्र दिले होते. त्यावेळी तलाठी श्री. राठोड साहेब यांनी मला सदर जमिनीची फेरफारला नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप नसलेबाबत अगोदर नोटीस काढावी लागते व त्यानंतर फेरफारला नोंद घेतली जाते. त्याकरीता तुला 4,000/- रुपये खर्च येईल व ते पैसे तु आणुन दिल्यानंतर तुझे काम करतो असे सांगितले. तेंव्हा मी त्यांना साहेब मी गरीब माणुस आहे, ऐवढे पैसे माझ्याकडे नाहीत असे म्हणालो असता त्यांनी मला तु 4,000/- रुपये दिल्याशिवाय तुझे काम होणार नाही असे सांगितले. तेंव्हा माझे लक्षात आले की, तलाठी श्री.राठोड साहेब यांना 4,000/- रुपये दिल्याशिवाय ते माझा भाऊ महेश कवडे याचे नावावर खरेदी घेतलेल्या जमिनीची नोटीस काढुन फेरफारला नोंद घेणार नाहीत.
तलाठी श्री.राठोड साहेब हे माझ्याकडे मागणी करीत असलेले 4000/- रुपये ही कोणतीही शासकीय फिस नसुन ती लाचच असल्याची माझी खात्री झाली आहे. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. तसेच त्यांचा व माझा पैसे देण्याघेण्याचा किंवा उधार उसणवारीचा कोणताही व्यवहार झालेला नाही. अथवा आमची आपसी दुश्मनी नाही. राठोड साहेब हे माझ्याकडे लाच म्हणुन जेवढया रक्कमेची मागणी करतील तेवढी रक्कम मी हजर करीन. आज रोजी मी तहसिल कार्यालय, कळंब येथे जावुन राठोड साहेब, तलाठी सज्जा, मौजे अंदोरा ता.कळंब जि. धाराशिव यांची भेट घेवुन त्यांना माझे कामाबाबत बोलणार आहे. तरी त्यांनी माझेकडे लाचेची मागणी करुन स्विकारल्यानंतर त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी." वगैरे मजकुरची तक्रार म्हेत्रे साहेब, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, धाराशिव यांच्याकडे दिली व त्यांनी माझी तक्रार टंकलेखनासाठी पोना/शेवाळे यांना प्रतिवेदीत केली. त्यावरुन पोना/शेवाळे यांनी माझी तक्रार लॅपटॉपवर टंकलिखीत करुन त्यांची प्रिन्ट काढली. त्यानंतर माझी लॅपटॉपवर टंकलिखीत केलेली तक्रार व मी तोंडी सांगितलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्याने त्यावर मी, म्हेत्रे साहेब व उपस्थित पंचांनी त्यावर सहया केल्या.
त्यानंतर पोलीस उप अधिक्षक म्हेत्रे साहेब यांनी मला कळविले की, माझ्या तक्रारीचे अनुषंगाने माझा भाऊ महेश कवडे यांचे नावावर खरेदी घेतलेल्या शेत जमीनीची नोटीस काढुन फेरफारला नोंद घेण्यासाठी माझ्याकडे तलाठी श्री. राठोड तलाठी सज्जा, अंदोरा ता. कळंब जि. धाराशिव हे लाचेची मागणी करतात किंवा कसे? या करीता त्यांची लाचमागणी पडताळणी करण्यात येणार आहे. त्यांची लाचेची मागणी सिध्द झाल्यास त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजीत करण्यात येईल असे सांगितले. तसेच त्यांनी दोन्ही पंचांची पंच म्हणुन काम करण्याची सहमती घेवुन किसन बिभिषण शिंदे, कंत्राटी ग्रामसेवक, पंचायत समिती, धाराशिव यांची पंच क्रमांक 1 म्हणुन तर अप्पुराज रुपचंद जाधव, कनिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (प्रा.) जिल्हा परिषद, धाराशिव. यांची पंच क्रमांक 2 म्हणुन नेमणुक केली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला कळविले की, लाचमागणी पडताळणी दरम्यान व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांनी पोना/बेळे यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे पोना/बेळे यांनी सोबत आणलेल्या एका काळया रंगाच्या बॅगमधुन व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन त्याबाबत मला व दोन्ही पंचांना सविस्तर माहिती देवुन त्याचे प्रात्यक्षीक



Scanned with CamScanner

करुन दाखविले व एक नवीन मेमरी कार्ड व्हॉइस रेकॉर्डरमध्ये टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण रेकॉर्ड नसलेबाबत खात्री करुन दिली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी माझे तसेच तलाठी श्री. राठोड यांचेत होणारे संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड होणार असलेबाबत सांगितले.
त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला तलाठी श्री. राठोड यांची भेट कोठे होईल ? याबाबत विचारले असता मी त्यांना तलाठी श्री.राठोड हे तहसिल कार्यालय, कळंब येथेच असुन तेथेच त्यांची भेट होईल असे सांगितले. तेव्हा म्हेत्रे साहेब यांनी लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने मला सुचना दिली की, मी तलाठी श्री.राठोड यांची तहसिल कार्यालय, कळंब येथे पंचासह जावून भेट घेवुन त्यांना आपले कामासंदर्भाने बोलावे. त्यांना फोन केल्यास मोबाईलचा स्पिकर ऑन करुन बोलावे. दरम्यान त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांच्याकडुन वेळ मागुन घेवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत यावे. तसेच त्यांनी पंचांनाही सापळा कार्यवाहीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.
त्यानंतर त्यांनी पोना/बेळे यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे पोना/बेळे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे अंगावरील शर्टचे आतमध्ये असलेल्या बनियनला कंबरेच्या वर उजव्या बाजुस पिनने लावुन मला व पंच क्रमांक 1 किसन शिंदे यांना माझेकडील मोटार सायकल क्रमांक MH-25-AY-4602 ने तलाठी श्री.राठोड यांची भेट घेण्यासाठी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणावरुन तहसिल कार्यालय, कळंबकडे 13.37 वा. रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच किसन शिंदे असे तहसिल कार्यालय, कळंब येथे गेलो. तेथे मी तलाठी श्री.राठोड यांना पाहिले असता ते दिसले नाहीत, म्हणून मी माझे मोबाईलवरुन स्पिकर ऑन करुन तलाठी श्री.राठोड यांना फोन केला व त्यांचेशी बोललो असता त्यांनी मला चार वाजता कळंबला येणार असल्याचे सांगून कळंब येथेच थांबण्याचे सांगितले. त्यानंतर तेथुन मी व पंच किसन शिंदे माझेकडील मोटार सायकलने निघुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 13.54 वा. परत आलोत. त्यानंतर पोना/बेळे यांनी माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन, बंद करुन म्हेत्रे साहेबांकडे दिला. तेव्हा म्हेत्रे साहेब यांनी मला तेथे बाजुला जावुन थांबण्याची सुचना केल्याने मी तेथे बाजुला जावुन थांबलो. त्यानंतर काही वेळाने मला म्हेत्रे साहेब यांनी त्यांचेजवळ बोलावुन घेवुन हकीकत विचारली असता मी वरील प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर त्यांचे सुचनेवरुन पोना/बेळे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामधील लाचमागणी संदर्भाने महत्वाचे संभाषण माझे व दोन्ही पंचासमक्ष ऐकले व संभाषणाबाबत मला व पंचांना विचारपुस केली. त्यावरुन म्हेत्रे साहेब यांनी माझ्याशी, पंच व सापळा पथक यांचेशी विचारविनीमय करुन तलाठी श्री. राठोड यांची भेट घेण्यासाठी चार वाजता पुन्हा मला पंचासह पाठविण्याचे सर्वानुमते ठरले.
त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी कळविले की, आज रोजी लाचमागणी पडताळणी कारवाई दरम्यान व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकलेल्या मेमरी कार्ड मध्येच फाईल बनवुन पुन्हा माझेत व तलाठी श्री. राठोड यांचेत होणारे संभाषण रेकॉर्ड होणार आहे. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी त्यांचे जवळील व्हॉईस रेकॉर्डर पोना/बेळे यांचेकडे देवून पोना/बेळे यांना दिलेल्या सुचने प्रमाणे पोना/बेळे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे आतमध्ये असलेल्या बनियनला कंबरेच्या वर उजव्या बाजुस पिनने लावुन मला व पंच क्रमांक 1 किसन शिंदे यांना माझेकडील मोटार सायकल क्रमांक MH-25-AY-4602 ने तलाठी श्री.राठोड यांची भेट घेण्यासाठी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणावरुन तहसिल कार्यालय, कळंबकडे 16.08 वा. रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच किसन शिंदे असे तहसिल कार्यालय, कळंब येथे गेलो. तेथे मी तलाठी श्री.राठोड यांना पाहिले असता ते दिसले नाहीत, म्हणून मी माझे मोबाईलवरुन स्पिकर ऑन करुन तलाठी श्री.राठोड यांना फोन केला व त्यांचेशी बोललो असता त्यांनी मला कळंब येथेच थांबून राहण्याचे सांगितले. नंतर काही वेळाने तलाठी श्री.राठोड हे त्यांचे जवळील होन्डा कंपनीची युनिकॉर्न मोटार सायकलवर तहसिल कार्यालय, कळंबचे आवारात गेटजवळ आले. तेव्हा मी व पंच किसन शिंदे असे तलाठी श्री. राठोड यांचेजवळ गेलो. त्यावेळी माझेत व तलाठी श्री. राठोड यांचेत भाऊ महेश कवडे याचे नावावर खरेदी घेतलेल्या शेत जमिनीचे फेरफार संदर्भाने बोलणे झाले. त्यावेळी तलाठी श्री. राठोड यांनी माझेकडे भावाचे नावावर खरेदी घेतलेल्या शेत जमिनीची नोटीस काढून फेरफारला नोंद घेण्यासाठी त्यांना स्वत:ला व साहेबाला दयावे लागतेत असे म्हणुन 4,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 3,000/- रुपये लाच रक्कम उदईक रोजी ईटकुर येथे घेवून येण्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच किसन शिंदे असे त्यांचेपासुन निघुन माझेकडील मोटार सायकलने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 17.44 वा. परत आलोत. तेव्हा म्हेत्रे साहेब यांनी माझेशी, पंच व सापळा पथक यांचेशी विचारविनीमय केला व तलाठी श्री.राठोड यांचेविरुध्द दिनांक 15.05.2024 रोजी सकाळी ईटकुर येथे सापळयाचे आयोजन करण्याचे सर्वानुमते ठरले.
त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे दिनांक 15.05.2024 रोजी मी, पंच व सापळा पथक असे कोठाळवाडी शिवारात सुरक्षित ठिकाणी गेलो. त्यावेळी म्हेत्रे साहेब यांनी कळविले की, दिनांक 14.05.2024 रोजी लाचमागणी पडताळणी कारवाई दरम्यान तलाठी श्री.राठोड यांनी माझ्याकडे भाऊ महेश कवडे याचे नावावर खरेदी घेतलेल्या शेत जमिनीची नोटीस काढून फेरफारला नोंद घेण्यासाठी 4,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी



Scanned with CamScanner

अंती 3,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व मला आज रोजी तलाठी श्री.राठोड यांनी ईटकुर येथे 3,000/- रूपये घेऊन बोलावल्याने आज रोजी ईटकुर येथे तलाठी श्री.राठोड यांचेविरुध्द लाचेच्या सापळ्याचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले.
त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी कळविले की, लाचेच्या नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावण्याची सापळापुर्व कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांच्या सुचनेवरुन मी माझ्याजवळील सर्व रोख रक्कम व चिज वस्तु काढुन त्यांचेसमोर खाजगी वाहनाचे शिटवर ठेवल्या. मग त्यांनी अँन्थ्रासीन पावडर लावणे, अँन्थ्रासीन पावडरचे उपयोग, गुणधर्म व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा उपयोग याबाबत आम्हास माहिती दिली. त्यानंतर त्यांचे सुचनेवरुन सपोफौ/शेख यांनी मी तलाठी श्री.राठोड यांना देण्यासाठी आणलेल्या 500/- रुपये दराच्या 6 चलनी नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावुन त्या नोटांची खाजगी वाहनाचे दरवाजे व काचा बंद करुन केलेल्या कृत्रीम अंधारात अल्ट्राव्हायोलेटच्या लॅम्पने तपासणी करुन त्याचे सविस्तर प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर सदर नोटांची घडी सपोफौ/शेख यांनी माझे पॅन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिशामध्ये अलगद ठेवुन दिली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी तलाठी श्री.राठोड यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर डोक्यावरुन डावा हात फिरवण्याचा ईशारा मला नेमुन दिला. तसेच तलाठी श्री. राठोड यांची भेट न झाल्यास नेमूण दिलेला इशारा न करता सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत येणे बाबत सुचना दिली.
त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला, दोन्ही पंचाना व सापळा पथकातील सदस्यांना सविस्तर सुचना दिल्या व नंतर त्यांच्या सुचनेवरुन पोना/बेळे यांनी एक नवीन मेमरी कार्ड व्हॉइस रेकॉर्डरमध्ये टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण रेकॉर्ड नसलेबाबत खात्री करुन दिली व त्यांनी माझे व तलाठी श्री.राठोड यांचेत होणारे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड होणार असलेबाबत सांगितले.
सदर फिर्यादची एक प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAVI SHRIHARI SANAP(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with CamScanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे, कळंब
जि.धाराशिव

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** RAVI SHRIHARI SAN/

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**



Scanned with CamScanner

**फिर्याद** दिनांक 19.05.2024

मी राहुल भगवंत कवडे, वय 25 वर्ष, व्यवसाय- शेती रा.कन्हेरवाडी ता. कळंब जि.धाराशिव मोबाईल नंबर 9960201674:

दिनांक 14.05.2024 रोजी मी कळंब येथे सुरक्षीत ठिकाणी हजर राहुन तक्रार दिली होती. त्यामधील हकिगत अशी की, " मी वरील गावचा राहणारा असुन माझे इयत्ता बारावीपर्यत शिक्षण झालेले आहे. मौजे अंदोरा शिवारात माझी वडीलोपार्जीत शेत जमीन असुन मी शेती व्यवसाय करुन माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहे.

माझा मोठा भाऊ महेश कवडे याचे नावाने गेल्या पंधरा दिवसापुर्वी मौजे अंदोरा शिवारातील शेत गट नंबर 29 मधील 55 आर शेत जमीन तडवळा येथील धनंजय पाटील यांचेकडुन खरेदी करुन घेतलेली आहे. गेल्या आठ दिवसापुर्वी सदर खरेदी घेतलेल्या जमीनीचा फेरफार नोंद करण्यासाठी मी अंदोरा सज्जाचे तलाठी श्री. राठोड साहेब यांच्याकडे भाऊ महेश कवडे याचे नावाने अर्ज देवुन त्यासोबत कागदपत्र दिले होते. त्यावेळी तलाठी श्री. राठोड साहेब यांनी मला सदर जमिनीची फेरफारला नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप नसलेबाबत अगोदर नोटीस काढावी लागते व त्यानंतर फेरफारला नोंद घेतली जाते. त्याकरीता तुला 4,000/- रुपये खर्च येईल व ते पैसे तु आणुन दिल्यानंतर तुझे काम करतो असे सांगीतले. तेंव्हा मी त्यांना साहेब मी गरीब माणुस आहे, ऐवढे पैसे माझ्याकडे नाहीत असे म्हणालो असता त्यांनी मला तु 4,000/- रुपये दिल्याशिवाय तुझे काम होणार नाही असे सांगितले. तेंव्हा माझे लक्षात आले की, तलाठी श्री.राठोड साहेब यांना 4,000/- रुपये दिल्याशिवाय ते माझा भाऊ महेश कवडे याचे नावावर खरेदी घेतलेल्या जमिनीची नोटीस काढुन फेरफारला नोंद घेणार नाहीत.

तलाठी श्री.राठोड साहेब हे माझ्याकडे मागणी करीत असलेले 4000/- रुपये ही कोणतीही शासकीय फिस नसुन ती लाचच असल्याची माझी खात्री झाली आहे. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. तसेच त्यांचा व माझा पैसे देण्याघेण्याचा किंवा उधार उसणवारीचा कोणताही व्यवहार झालेला नाही. अथवा आमची आपसी दुश्मनी नाही. राठोड साहेब हे माझ्याकडे लाच म्हणुन जेवढया रक्कमेची मागणी करतील तेवढी रक्कम मी हजर करीन.

आज रोजी मी तहसिल कार्यालय, कळंब येथे जावुन राठोड साहेब, तलाठी सज्जा, मौजे अंदोरा ता.कळंब जि.धाराशिव यांची भेट घेवुन त्यांना माझे कामाबाबत बोलणार आहे. तरी त्यांनी माझेकडे लाचेची मागणी करुन स्विकारल्यानंतर त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी." वगैरे मजकुरची तक्रार म्हेत्रे साहेब, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, धाराशिव यांच्याकडे दिली व त्यांनी माझी तक्रार टंकलेखनासाठी पोना/शेवाळे यांना प्रतिवेदीत केली. त्यावरुन पोना/शेवाळे यांनी माझी तक्रार लॅपटॉपवर टंकलिखीत करुन त्यांची प्रिन्ट काढली. त्यानंतर माझी लॅपटॉपवर टंकलिखीत केलेली तक्रार व मी तोंडी सांगितलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्याने त्यावर मी, म्हेत्रे साहेब व उपस्थित पंचांनी त्यावर सहया केल्या.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक म्हेत्रे साहेब यांनी मला कळविले की, माझ्या तक्रारीचे अनुषंगाने माझा भाऊ महेश कवडे यांचे नावावर खरेदी घेतलेल्या शेत जमीनीची नोटीस काढुन फेरफारला नोंद घेण्यासाठी माझ्याकडे तलाठी श्री. राठोड तलाठी सज्जा, अंदोरा ता. कळंब जि. धाराशिव हे लाचेची मागणी करतात किंवा कसे? या करीता त्यांची लाचमागणी पडताळणी करण्यात येणार आहे. त्यांची लाचेची मागणी सिध्द झाल्यास त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजीत करण्यात येईल असे सांगितले. तसेच त्यांनी दोन्ही पंचांची पंच म्हणुन काम करण्याची सहमती घेवुन किसन बिभिषण शिंदे, कंत्राटी ग्रामसेवक, पंचायत समिती, धाराशिव यांची पंच क्रमांक 1 म्हणुन तर अप्पुराज रुपचंद जाधव, कनिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (प्रा.) जिल्हा परिषद, धाराशिव. यांची पंच क्रमांक 2 म्हणुन नेमणुक केली.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला कळविले की, लाचमागणी पडताळणी दरम्यान व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांनी पोना/बेळे यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे पोना/बेळे यांनी सोबत आणलेल्या एका काळया रंगाच्या बॅगमधुन व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन त्याबाबत मला व दोन्ही पंचांना सविस्तर माहिती देवुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले व एक नवीन मेमरी कार्ड व्हॉइस रेकॉर्डरमध्ये टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण रेकॉर्ड

समक्ष
[signature] 19/05/24
(सिध्दाराम म्हेत्रे)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन,ब्युरो,धाराशिव

पंच
1> [signature]
2> [signature] [signature]

Scanned with CamScanner

नसलेबाबत खात्री करुन दिली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी माझे तसेच तलाठी श्री. राठोड यांचेत होणारे संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड होणार असलेबाबत सांगितले.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला तलाठी श्री. राठोड यांची भेट कोठे होईल ? याबाबत विचारले असता मी त्यांना तलाठी श्री.राठोड हे तहसिल कार्यालय, कळंब येथेच असुन तेथेच त्यांची भेट होईल असे सांगितले. तेव्हा म्हेत्रे साहेब यांनी लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने मला सुचना दिली की, मी तलाठी श्री.राठोड यांची तहसिल कार्यालय, कळंब येथे पंचासह जावून भेट घेवुन त्यांना आपले कामासंदर्भाने बोलावे. त्यांना फोन केल्यास मोबाईलचा स्पिकर ऑन करुन बोलावे. दरम्यान त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांच्याकडुन वेळ मागुन घेवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत यावे. तसेच त्यांनी पंचांनाही सापळा कार्यवाहीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर त्यांनी पोना/बेळे यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे पोना/बेळे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे अंगावरील शर्टचे आतमध्ये असलेल्या बनियनला कंबरेच्या वर उजव्या बाजुस पिनने लावुन मला व पंच क्रमांक 1 किसन शिंदे यांना माझेकडील मोटार सायकल क्रमांक MH-25/AY4602 ने तलाठी श्री.राठोड यांची भेट घेण्यासाठी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणावरुन तहसिल कार्यालय, कळंबकडे 13.37 वा. रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच किसन शिंदे असे तहसिल कार्यालय, कळंब येथे गेलो. तेथे मी तलाठी श्री.राठोड यांना पाहिले असता ते दिसले नाहीत, म्हणून मी माझे मोबाईलवरुन स्पिकर ऑन करुन तलाठी श्री.राठोड यांना फोन केला व त्यांचेशी बोललो असता त्यांनी मला चार वाजता कळंबला येणार असल्याचे सांगून कळंब येथेच थांबण्याचे सांगितले. त्यानंतर तेथुन मी व पंच किसन शिंदे माझेकडील मोटार सायकलने निघुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 13.54 वा. परत आलोत.

त्यानंतर पोना/बेळे यांनी माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन, बंद करुन म्हेत्रे साहेबांकडे दिला. तेव्हा म्हेत्रे साहेब यांनी मला तेथे बाजुला जावुन थांबण्याची सुचना केल्याने मी तेथे बाजुला जावुन थांबलो. त्यानंतर काही वेळाने मला म्हेत्रे साहेब यांनी त्यांचेजवळ बोलावुन घेवुन हकीकत विचारली असता मी वरील प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर त्यांचे सुचनेवरुन पोना/बेळे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामधील लाचमागणी संदर्भाने महत्वाचे संभाषण माझे व दोन्ही पंचासमक्ष ऐकले व संभाषणाबाबत मला व पंचांना विचारपुस केली. त्यावरुन म्हेत्रे साहेब यांनी माझ्याशी, पंच व सापळा पथक यांचेशी विचारविनीमय करुन तलाठी श्री. राठोड यांची भेट घेण्यासाठी चार वाजता पुन्हा मला पंचासह पाठविण्याचे सर्वानुमते ठरले.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी कळविले की, आज रोजी लाचमागणी पडताळणी कारवाई दरम्यान व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकलेल्या मेमरी कार्ड मध्येच फाईल बनवुन पुन्हा माझेत व तलाठी श्री. राठोड यांचेत होणारे संभाषण रेकॉर्ड होणार आहे. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी त्यांचे जवळील व्हॉईस रेकॉर्डर पोना/बेळे यांचेकडे देवून पोना/बेळे यांना दिलेल्या सुचने प्रमाणे पोना/बेळे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे आतमध्ये असलेल्या बनियनला कंबरेच्या वर उजव्या बाजुस पिनने लावुन मला व पंच क्रमांक 1 किसन शिंदे यांना माझेकडील मोटार सायकल क्रमांक MH-25/AY4602 ने तलाठी श्री.राठोड यांची भेट घेण्यासाठी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणावरुन तहसिल कार्यालय, कळंबकडे 16.08 वा. रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच किसन शिंदे असे तहसिल कार्यालय, कळंब येथे गेलो. तेथे मी तलाठी श्री.राठोड यांना पाहिले असता ते दिसले नाहीत, म्हणून मी माझे मोबाईलवरुन स्पिकर ऑन करुन तलाठी श्री.राठोड यांना फोन केला व त्यांचेशी बोललो असता त्यांनी मला कळंब येथेच थांबून राहण्याचे सांगितले. नंतर काही वेळाने तलाठी श्री.राठोड हे त्यांचे जवळील होन्डा कंपनीची युनिकॉर्न मोटार सायकलवर तहसिल कार्यालय, कळंबचे आवारात गेटजवळ आले. तेव्हा मी व पंच किसन शिंदे असे तलाठी श्री. राठोड यांचेजवळ गेलो. त्यावेळी माझेत व तलाठी श्री. राठोड यांचेत भाऊ महेश कवडे याचे नावावर खरेदी घेतलेल्या शेत जमिनीचे फेरफार संदर्भाने बोलणे झाले. त्यावेळी तलाठी श्री. राठोड यांनी माझेकडे भावाचे नावावर खरेदी घेतलेल्या शेत जमिनीची नोटीस काढून फेरफारला नोंद घेण्यासाठी त्यांना स्वत:ला व साहेबाला दयावे लागतेत असे म्हणुन 4,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 3,000/- रुपये लाच रक्कम उदईक रोजी ईटकुर येथे घेवून येण्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच किसन शिंदे असे त्यांचेपासुन निघुन माझेकडील मोटार सायकलने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 17.44 वा.

समक्ष
[signature] 10/05/24
**(सिध्दाराम म्हेत्रे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**अँन्टी करप्शन,ब्युरो,धाराशिव**

पंच
1> [signature]   2> [signature]   [signature]

Scanned with CamScanner

परत आलोत. तेव्हा म्हेत्रे साहेब यांनी माझेशी, पंच व सापळा पथक यांचेशी विचारविनीमय केला व तलाठी श्री.राठोड यांचेविरुध्द दिनांक 15.05.2024 रोजी सकाळी ईटकुर येथे सापळयाचे आयोजन करण्याचे सर्वानुमते ठरले.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे दिनांक 15.05.2024 रोजी मी, पंच व सापळा पथक असे कोटाळवाडी शिवारात सुरक्षित ठिकाणी गेलो. त्यावेळी म्हेत्रे साहेब यांनी कळविले की, दिनांक 14.05.2024 रोजी लाचमागणी पडताळणी कारवाई दरम्यान तलाठी श्री.राठोड यांनी माझ्याकडे भाऊ महेश कवडे याचे नावावर खरेदी घेतलेल्या शेत जमिनीची नोटीस काढून फेरफारला नोंद घेण्यासाठी 4,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 3,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व मला आज रोजी तलाठी श्री.राठोड यांनी ईटकुर येथे 3,000/- रूपये घेऊन बोलावल्याने आज रोजी ईटकुर येथे तलाठी श्री.राठोड यांचेविरुध्द लाचेच्या सापळयाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी कळविले की, लाचेच्या नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावण्याची सापळापुर्व कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांच्या सुचनेवरुन मी माझ्याजवळील सर्व रोख रक्कम व चिज वस्तु काढुन त्यांचेसमोर खाजगी वाहनाचे शिटवर ठेवल्या. मग त्यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावणे, अॅन्थ्रासीन पावडरचे उपयोग, गुणधर्म व अॅल्ट्राव्हायलेट दिव्याचा उपयोग याबाबत आम्हास माहिती दिली. त्यानंतर त्यांचे सुचनेवरुन सपोफौ/शेख यांनी मी तलाठी श्री.राठोड यांना देण्यासाठी आणलेल्या 500/- रुपये दराच्या 6 चलनी नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावुन त्या नोटांची खाजगी वाहनाचे दरवाजे व काचा बंद करुन केलेल्या कृत्रीम अंधारात अॅल्ट्राव्हायोलेटच्या लॅम्पने तपासणी करुन त्याचे सविस्तर प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर सदर नोटांची घडी सपोफौ/शेख यांनी माझे पॅन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिशामध्ये अलगद ठेवुन दिली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी तलाठी श्री.राठोड यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर डोक्यावरुन डावा हात फिरवण्याचा ईशारा मला नेमुन दिला. तसेच तलाठी श्री.राठोड यांची भेट न झाल्यास नेमूण दिलेला इशारा न करता सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत येणे बाबत सुचना दिली.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला, दोन्ही पंचाना व सापळा पथकातील सदस्यांना सविस्तर सुचना दिल्या व नंतर त्यांच्या सुचनेवरुन पोना/बेळे यांनी एक नवीन मेमरी कार्ड व्हॉइस रेकॉर्डरमध्ये टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण रेकॉर्ड नसलेबाबत खात्री करुन दिली व त्यांनी माझे व तलाठी श्री.राठोड यांचेत होणारे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड होणार असलेबाबत सांगितले.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला तलाठी श्री.राठोड यांची भेट कोठे होईल? याबाबत विचारले असता मी त्यांना तलाठी श्री.राठोड यांनी आज रोजी ईटकुर येथे बोलाविले असून ईटकुर येथे असलेल्या तलाठी कार्यालयात त्यांची भेट होईल असे सांगितले.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांचे सुचनेवरुन पोना/बेळे यांनी सदर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे आतमध्ये असलेल्या बनियनला कंबरेच्या वर उजव्या बाजुस पिनने लावुन मला व पंच क्रमांक 1 किसन शिंदे यांना माझेकडील मोटार सायकल क्रमांक MH-25/AY4602 ने तलाठी श्री.राठोड यांची भेट घेण्यासाठी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणावरुन ईटकुरकडे 10.34 वा. रवाना केले. आमचे पाटोपाठ म्हेत्रे साहेब व सापळा पथक असे त्यांचेकडील खाजगी वाहनाने निघाले. मी व पंच किसन शिंदे असे माझ्याकडील मोटार सायकलने तलाठी कार्यालय, ईटकुर येथे गेलो. तेथे तलाठी श्री. राठोड यांना पाहीले असता ते न दिसल्याने मी माझे मोबाईलवरुन स्पिकर ऑन करुन तलाठी श्री.राठोड यांना फोन केला असता त्यांचा फोन बंद असल्याचे दिसून आले. त्यामुळे मी तलाठी कार्यालय, ईटकुर येथे हजर असलेल्या इसमास तलाठी श्री.राठोड यांचे बाबत विचारले असता त्यांनी राठोड साहेब आज नाहीत ते आजारी पडलेत.. अचानक गेले कायकी.. असे म्हणाले. त्यानंतर थोडा वेळ वाट पाहुन दोन वेळा मी, पंच किसन शिंदे यांचेसह तलाठी कार्यालय, ईटकुर येथे जावुन तेथे हजर असलेल्या इसमास तलाठी श्री.राठोड येतील की नाही.. असे म्हणुन विचारले असता त्यांनी काय सांगता येईना..आले तर आले अन आता काय.. असे सांगितले. त्यामुळे मी व पंच किसन शिंदे असे मला नेमुन दिलेला इशारा न करता तेथुन मोटार सायकलने निघुन 11.42 वा. सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलोत.

समक्ष [signature] 15/05/24 पंच [signature]

(सिध्दाराम म्हेत्रे)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन,ब्युरो,धाराशिव

1> [signature] 2> [signature]

Scanned with CamScanner

त्यानंतर पोना/बेळे यांनी माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन, बंद करुन म्हेत्रे साहेबांकडे दिला. तेव्हा म्हेत्रे साहेब यांनी मला तेथे बाजुला जावुन थांबण्याची सुचना केल्याने मी तेथे बाजुला जावुन थांबलो. त्यानंतर काही वेळाने मला म्हेत्रे साहेब यांनी त्यांचेजवळ बोलावुन घेवुन हकीकत विचारली असता मी वरील प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर त्यांचे सुचनेवरुन पोना/बेळे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामधील लाचमागणी संदर्भाने महत्वाचे संभाषण माझे व दोन्ही पंचासमक्ष ऐकले व संभाषणाबाबत मला व पंचांना विचारपुस केली. त्यानंतर तलाठी श्री. राठोड यांना देण्यासाठी माझ्याकडे देण्यात आलेली लाच रक्कम मी म्हेत्रे साहेब यांचेकडे दिली.

त्यानंतर मी तलाठी श्री. राठोड यांना दोन - तिन वेळा फोन केला, परंतू त्यांचा फोन बंद असल्याचे दिसून आले. तसेच मी तहसिल कार्यालय, कळंब येथे जावून तलाठी श्री. राठोड यांचेबाबत माहिती घेतली असता ते रजा टाकून निघून गेल्याचे समजले. तसेच तलाठी श्री. राठोड यांचे संपुर्ण नावाबाबत मी माहिती घेतली असता त्यांचे नाव श्री.कल्याण शामराव राठोड, वय 43 वर्षे, व्यवसाय नोकरी, तलाठी, सज्जा अंदोरा, अतिरिक्त कार्यभार- सज्जा ईटकुर, ता.कळंब जि.धाराशिव मुळ रा. आंथरवन पिंपरी ता.जि.बीड सध्याचा पत्ता- ज्ञानेश्वर नगर, राजीव गांधी चौक, आयटीआय कॉलेजच्या पाटीमागे, बीड ता.जि.बीड असे असल्याचे समजले आहे.

एकंदरीत दिनांक 14.05.2024 रोजी 16.08 ते 17.44 वा. चे दरम्यान तहसिल कार्यालय, कळंब जि. धाराशिचे चे आबारात गेटजवळ श्री.कल्याण शामराव राठोड, वय 43 वर्षे, व्यवसाय नोकरी, तलाठी, सज्जा अंदोरा, अतिरिक्त कार्यभार- सज्जा ईटकुर, ता.कळंब जि.धाराशिव मुळ रा. आंथरवन पिंपरी ता.जि.बीड सध्याचा पत्ता- ज्ञानेश्वर नगर, राजीव गांधी चौक, आयटीआय कॉलेजच्या पाटीमागे, बीड ता.जि.बीड यांनी माझ्याकडे भाऊ महेश कवडे याचे नावावर खरेदी घेतलेल्या शेत जमिनीची नोटीस काढून फेरफारला नोंद घेण्यासाठी त्यांना स्वत:ला व साहेबाला दयावे लागतेत असे म्हणुन 4,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 3,000/- रुपये लाचेची मागणी केली व सदरची लाच रक्कम त्यांनी दिनांक 15.05.2024 रोजी ईटकुर ता.कळंब येथे घेवून येण्याचे सांगितले. परंतु त्यांना संशय आल्याने ते दिनांक 15.05.2024 रोजी लाच रक्कम स्विकारण्यास ईटकुर येथे आले नाहीत, म्हणुन त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यासाठी मी माझी फिर्याद देत असुन सदरची फिर्याद लॅपटॉपवर टंकलिखीत करुन त्याची प्रिन्ट काढुन मला वाचण्यास दिली ती मी वाचुन पाहिली, ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

[signature] 19/05/24

( सिध्दाराम म्हेत्रे )
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव.

पंच

1) [signature] 19-05-24

2) [signature] 19/05/24

[signature]
19/05/2024
कवडे राहुल भगवंत

Scanned with CamScanner